साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–दिव्यांश बसंत कोलारे,
वय २७ वर्ष, व्यवसाय– व्यवसाय,
राह.डब्लु.सी.एल.कॉलोनी उमरेड, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. पोलिसांनी मला पंचनामा करण्याकामी समन्सपत्र दिले होते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशाणी क्र.१०** देण्यात आला. त्यानंतर मी घटनास्थळ स्मृती बार डब्लु.सी.एल, उमरेड येथे गेलो होतो व पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला, मला वाचुन दाखविला. सदर पंचनामा हा अपघाताच्या बाबतचा होता. घटनास्थळावरून पोलिसांनी माझ्यासमक्ष नंबर प्लेटचे तुकडे जप्त केले होते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशानि क्र.११** देण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळाचे फोटो काढले होते.

२. आता मला फोटो दाखविण्यात आला त्यामध्ये एक कारचा फोटो आहे व एक घटनास्थळावरिल फोटो आहे त्यामध्ये माझा फोटो आहे अनुक्रमे **आर्टीकल अ** आणि **ब** देण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी माझ्यासमक्ष कारचा पंचनामा तयार केला होता. आता मला सदर पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशानि क्र.१२** देण्यात आले.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड.एस.व्ही.काळे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर हजर राहण्याकामी मला पोलिसांनी अगोदर सुचनापत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांच्या सांगण्यावरून वरिल पंचनाम्यावर सह्या केल्या. मी घटनास्थळाच्या चतुर्सिमा सांगु शकतो. घटना स्थळ हे स्मृती बारच्या समोर होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर कोण कोण लोकं होते हे मला माहिती नाही व त्यांची नावेसुध्दा मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा

कोणत्या दिवशी तयार केला हे मला माहिती नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्याच दिवशी तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा हा अगोदरच तयार करून ठेवला होता व मी फक्त त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही व मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१२ वर मी पोलिसांच्या सांगण्यावरून सह्या केल्या.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१६.०४.२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड